**नियमित दिवाणी कब्जा क्र. ०१/२०२३ मधील नि.क्र. १० वरील आदेश**
( पारीत दिनांक – १५/०९/२०२३)
शितल विष्णू शेडबाळे वि. विष्णू हरी शेडबाळे.

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६ नियम १७ अन्वये वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीच्या कथनानुसार, प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र. ६ चे नाव 'राजकुमार सिध्दा शेडबाळे' असे नजरचुकीने नमुद झालेले आहे. त्यांचे खरे नाव रामचंद्र शिवगोंडा शेडबाळे असे आहे. तरी, प्रतिवादी क्र. ६ राजकुमार सिध्दा शेडबाळे ऐवजी 'रामचंद्र शिवगोंडा शेडबाळे' असे निशाणी क्र. १ वर नमुद करणेस परवानगी मिळण्याबाबत सदरचा दुरुस्ती अर्ज दाखल करण्यात आला आहे.

३. सदरील अर्जास प्रतिवादी यांनी अर्जाच्या मागील बाजूस त्यांचे म्हणणे दाखल केले असून अर्जातील कथने नाकारली आहेत. सदरचे अर्जामध्ये कोणतेही सबळ कारण नमुद नाही. त्यामुळे, सदर अर्ज फेटाळणे गरजेचे आहे. तसेच, सदर दुरुस्तीमुळे दावेत बदल होत आहे. त्यामुळे, सदर अर्ज नामंजूर करणेत यावा व मंजूर करायचा झाल्यास जास्तीत जास्त कॉस्ट करण्यात यावी अशी प्रतिवादीनी विनंती केली आहे.

४. उभय बाजुच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने खालील प्रश्न बिंदू (Points) माझ्यासमोर उपस्थित झाले व त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसे सहित, मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.–

| अ.क्र. | प्रश्न बिंदू (**Points**) | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादपत्रातील प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्याच्या गुणदोषावरील अंतिम निर्णयाकरीता गरजेची आहे का ? | होकारार्थी |
| २. | प्रस्तुतच्या दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलेल का ? | नकारार्थी |
| ३. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## – का र ण मिं मा सा –

**प्रश्न बिंदू क्र. १ व २ बाबत–**

६. वरील सर्व प्रश्न बिंदू हे एकमेकांशी निगडीत असल्याने अर्जातील वस्तुस्थितीची पुनरावृत्ती टाळण्याकरीता, वरील दोन्ही प्रश्न बिंदूची एकत्रितरित्या चर्चा करण्यात येत आहे.

७. प्रस्तुत प्रकरणी दावा हा वाटपाचा, तुटक कब्जाचा व हक्कज्ञापनासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रस्तुत प्रकरणातील दाव्यामध्ये व निशाणी क्र. १ मधील अर्जामध्ये प्रतिवादी क्र. ६ राजकुमार सिध्दा शेडबाळे ऐवजी 'रामचंद्र शिवगोंडा शेडबाळे' दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे. दाव्याच्या कामी तांत्रिक त्रुटी राहू नये त्याकरीता वादीने सदरचा अर्ज दाखल केला आहे असे दिसते. दाव्यातील समन्सची बजावणी योग्यरित्या होण्याकरीता सदरची दुरुस्ती ही गरजेची आहे. त्यामुळे, दाव्याच्या कामी कोणताही तांत्रिक दोष राहू नये याकरीता सदरची दुरुस्ती मंजूर करणे योग्य राहील असे वाटते. सदरची दुरुस्ती मंजूर करण्यात आल्याने दाव्याचे स्वरुप बदलेल असे निश्चितच वाटत नाही. करीता, मी प्रश्नबिंदू क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी व प्रश्नबिंदू क्रमांक २ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**प्रश्नबिंदू क्र. ३–**

८. प्रश्न बिंदू क्र. १ चे उत्तर होकारार्थी व प्रश्नबिंदू क्र. २ चे उत्तर नकारार्थी देण्यात आलेले असल्यामुळे सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी प्रश्न बिंदू क्र. ३ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र.१०) वादी यांनी प्रतिवादी यांना आज तारखेपासून ०७ दिवसांच्या आत रक्कम रु. २००/– खर्च (costs) स्वरुपात देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२) वादीनी मंजूर दुरुस्ती अर्जाप्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती वादपत्रामध्ये आज तारखेपासून १४ दिवसांच्या आत करुन घ्यावी व त्याप्रमाणे वादपत्राची सुधारित प्रत अभिलेखावरती त्वरीत दाखल करावी.

Amol Bharat Jawale
Digitally signed by Amol Bharat Jawale
Date: 2023.09.18 17:46:08 +0900

कागल. **(अमोल भारत जवळे)**

दिनांक – १५/०९/२०२३ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.